पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३५ /२०२३ दि. ८ /०३/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०९/०३/२०२३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचा **'वर्धापन दिन'** निमित्त मनसे अध्यक्ष मा. श्री. राज ठाकरे साहेब यांचे अध्यक्षतेखाली गडकरी रंगायतन येथे मनसे पक्षाच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. सदर मेळाव्यास मोठया संख्येने मनसे कार्यकर्ते उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे ठिकाणी मोठया प्रमाणात वाहने येणार आहेत. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **सुभाष बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) डॉ. मुस चौकातून गडकरी रंगायतन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना हॉटेल ग्रीन लीफ येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने साईकृपा हॉटेल मार्गे डावे वळण घेवून न्यु इंग्लिश स्कूल येथून राम मारूती रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खंडु रांगणेकर चौक कडून गडकरी रंगायतन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना हॉटेल बिर्याणी दरबार येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने बच्चाजी रोड मार्गे मालतीबाई चिटणीस हॉस्पिटल येथून डावे वळणे घेवून टेंभीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) टॉवर नाका कडून गडकरी रंगायतन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना चिंतामणी ज्वेलर्स समोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने टेंभीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. ०९/०३/२०२३ रोजी दुपारी १४:०० ते कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( सुभाष बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
जिल्हाधिकारी, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

CamScanner

अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे, वागळे वाहतूक विभाग,/पोनि नौपाडा, वागळे, राबोडी, ठाणेनगर, वाहतूक उप विभाग.

CamScanner